# संपादकीय

**आयुष्यात अशक्य असं काहीच नाही, कारण शक्य या शब्दाचा अर्थच 'I Can' असा होतो.**

## संधी की वाढते आव्हान?

जागतिक अर्थव्यवस्था गेल्या काही वर्षांपासून अभूतपूर्व अस्थिरतेच्या काळातून जात आहे. रशिया–युक्रेन युद्धामुळे ऊर्जा आणि अन्नधान्याच्या किमतींमध्ये झालेली वाढ, पश्चिम आशियातील संघर्षामुळे निर्माण झालेली अनिश्चितता, जागतिक पुरवठा साखळीतील अडथळे आणि चीनमधील आर्थिक मंदी यामुळे जगभरातील व्यापाराचे पारंपरिक समीकरण बदलले आहे. या बदलत्या परिस्थितीत भारताने जागतिक व्यापारात स्वतःचे स्थान अधिक बळकट करण्याची संधी साधली आहे. विशेषतः युरोपीय बाजारपेठेत भारतीय निर्यातीला मिळणारा वाढता प्रतिसाद ही देशासाठी सकारात्मक बाब आहे. मात्र याचबरोबर युरोपमधून भारतात होणाऱ्या आयातीतही मोठी वाढ होत असल्याने व्यापार संतुलनाचा प्रश्न नव्याने ऐरणीवर आला आहे. भारत आणि युरोपियन संघ यांच्यातील व्यापार सातत्याने वाढत आहे. औषधनिर्मिती, वस्त्रोद्योग, अभियांत्रिकी उत्पादने, रसायने, माहिती तंत्रज्ञान सेवा, कृषी प्रक्रिया उद्योग आणि वाहनांचे सुटे भाग या क्षेत्रांत भारतीय उत्पादनांना युरोपमध्ये मोठी मागणी निर्माण झाली आहे. चीनवरील अवलंबित्व कमी करण्याच्या युरोपीय धोरणामुळे भारताला एक विश्वासार्ह पर्याय म्हणून पाहिले जात आहे. 'चायना प्लस वन' या धोरणामुळे अनेक युरोपीय कंपन्या भारताकडे वळत असून भारतीय उद्योगांसाठी ही मोठी संधी आहे. भारताची लोकशाही व्यवस्था, कुशल मनुष्यबळ, मोठी उत्पादन क्षमता, माहिती तंत्रज्ञानातील प्राविण्य आणि वेगाने विकसित होणारी पायाभूत सुविधा यामुळे युरोपीय गुंतवणूकदारांचा भारतावरील विश्वास वाढत आहे. 'मेक इन इंडिया', उत्पादनाशी निगडित प्रोत्साहन योजना आणि पायाभूत सुविधांवरील मोठी गुंतवणूक यामुळे भारत जागतिक उत्पादन केंद्र म्हणून उदयास येत आहे. त्यामुळे निर्यात वाढणे ही स्वाभाविक बाब आहे. मात्र या यशामागे एक चिंतेची बाजूही आहे. भारताकडून युरोपमध्ये निर्यात वाढत असताना युरोपमधून भारतात होणारी आयात त्याहून अधिक वेगाने वाढत आहे. अत्याधुनिक यंत्रसामग्री, औद्योगिक उपकरणे, संरक्षण साहित्य, वैद्यकीय उपकरणे, रसायने, लक्झरी उत्पादने आणि उच्च तंत्रज्ञानाची उत्पादने मोठ्या प्रमाणावर भारतात आयात केली जात आहेत. औद्योगिक विकासासाठी ही आयात काही प्रमाणात आवश्यक असली तरी तिचे प्रमाण सातत्याने वाढत राहिल्यास व्यापार तूट वाढण्याचा धोका निर्माण होतो. व्यापार तूट ही कोणत्याही अर्थव्यवस्थेसाठी दीर्घकालीन चिंतेची बाब असते. आयात निर्यातीपेक्षा अधिक झाल्यास परकीय चलनावर ताण येतो, रुपयावर दबाव निर्माण होतो आणि देशाची आर्थिक स्थिरता प्रभावित होऊ शकते. त्यामुळे केवळ व्यापाराचा आकडा वाढणे पुरेसे नाही, तर तो संतुलित असणेही तितकेच आवश्यक आहे. युरोपशी सुरू असलेल्या मुक्त व्यापार कराराच्या चर्चाही या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्त्वाच्या ठरत आहेत.

### राशिभविष्य

**मेष :** एखादा जुना प्रश्न नव्या दारातून उत्तर देईल. घाईपेक्षा शांततेचा वेग जास्त परिणामकारक ठरेल. अनपेक्षित व्यक्ती तुमचा आरसा बनेल.

**वृषभ :** वस्तूंपेक्षा आठवणी मौल्यवान वाटतील. हट्टाला थोडी विश्रांती दिली तर नशीब बोलू लागेल. खर्चापेक्षा समाधानाची कमाई मोठी ठरेल.

**मिथुन :** दोन वाटा दिसल्या तर तिसरीही शोधून पाहा. शब्दांपेक्षा विरामचिन्हे जास्त बोलतील. अचानक आलेली कल्पना जपून ठेवा.

**कर्क :** कुणीतरी मन मोकळं करेल. काळजीतून बाहेर पडा. जुन्या फोटोमध्ये नवा अर्थ दिसेल. प्रेम व्यक्त करण्यासाठी थेट बोला.

**सिंह :** दिवा लावणारे बना. कौतुक अनपेक्षित दिशेने येईल. एका 'नाही' मुळे मोठं 'हो' मिळेल. आत्मविश्वासाला नम्रतेची जोड द्या.

**कन्या :** सौंदर्य उमजेल. छोट्या बदलाने मोठा फरक जाणवेल. कागदावर उतरवलेली कल्पना उंच भरारी घेईल. शांत झोप लागेल.

**तूळ :** आज समतोल शोधू नका, तो स्वतः येईल. एखाद्या हास्यात लपलेला संदेश मिळेल. निर्णय मन आणि बुद्धीने घ्या.

**वृश्चिक :** शांत चेहऱ्यामागे मोठी ताकद दडलेली असेल. विश्वासाची किंमत वाढेल. अपूर्ण संवाद पूर्ण कराल. स्वतःवर संशय घेऊ नका.

**धनू :** प्रवास नसेल तरी विचार दूरवर जातील. नवीन शिकण्याची भूक भागवणारा क्षण मिळेल. एखादं वाक्य दिवसाचा दिशादर्शक बनेल.

**मकर :** शिस्तीतही सर्जनशीलतेला जागा द्या. जुनी मेहनत फळ दाखवेल. शांत निर्णय मजबूत ठरेल. उद्याची चिंता करू नका.

**कुंभ :** वेगळेपण लपवू नका, तेच तुमचं बळ आहे. अनोळखी कल्पना मित्र होईल. एका छोट्या कृतीने मोठा बदल सुरू होईल.

**मीन :** स्वप्नांना वास्तवाचा स्पर्श मिळेल. पाण्यासारखे विचार वाहू द्या. कला, संगीत किंवा कविता मन उजळवेल. कृतज्ञ वाटेल.

### गुगल ट्रेंडस्

- फिफा वर्ल्डकपमधील सामने, खेळाडू ट्रेंडिंगमध्ये होते.
- अमेरिका-इराण युद्धाविषयीच्या बातम्या चर्चेत होत्या.
- सेन्सेक्ससह स्टॉक मार्केटमधील विविध शेअर्स ट्रेंडिंगमध्ये होते.
- लॉरेन्स बिश्नोई गँगविरुद्ध एफबीआयने कारवाई सुरू केल्याची बातमी चर्चेत होती.

# पहिल्याच पावसात विकासाची पोलखोल

**कोणताही पूल, बोगदा किंवा महामार्ग उद्घाटनाच्या दिवशी यशस्वी ठरत नाही. त्याची खरी परीक्षा पहिल्या पावसात, पहिल्या पुरात आणि पहिल्या संकटात होते. महाराष्ट्रातील अनेक प्रकल्प या परीक्षेत वारंवार नापास होत असल्याचे चित्र यंदाच्या पावसाने पुन्हा एकदा समोर आणले आहे.**

जुलै महिना उजाडला, पण यंदा पावसाने सुरुवातीला वेळेवर हजेरी लावली नाही. शेतकरी, नागरिक, उद्योग, व्यापारी आणि प्रशासन अशा प्रत्येकाचे डोळे आकाशाकडे लागले होते. धरणांतील पाणीसाठा झपाट्याने कमी होत होता. अनेक शहरांमध्ये पाणी कपात सुरू झाली होती. दुष्काळाची चिंता दिवसेंदिवस वाढत होती. मात्र जुलैच्या पहिल्याच आठवड्यात काही दिवस झालेल्या मुसळधार पावसाने संपूर्ण परिस्थिती बदलून गेली. पाण्याची चिंता कमी झाली, पण त्याच वेळी विकासकामांच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले.

राज्यातील अनेक शहरांमध्ये रस्ते पाण्याखाली गेले. नव्याने बांधलेले रस्ते उखडले, खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले, पुलांवर पाणी साचले, तर काही ठिकाणी बोगद्यांमध्येच पाणी घुसले. कोट्यवधी रुपयांचा खर्च करून उभारण्यात आलेल्या पायाभूत सुविधांची अवस्था काही तासांच्या पावसातच बिकट झाली. यामुळे नागरिकांना वाहतूक कोंडी, अपघात आणि प्रचंड गैरसोयींचा सामना करावा लागला. विकासकामांवर हजारो कोटी रुपये खर्च होत असताना त्यांची गुणवत्ता इतकी निकृष्ट का असते, हा प्रश्न आता जनतेला पडू लागला आहे. कंत्राटदार, अधिकारी आणि संबंधित यंत्रणा यांच्यातील संगनमत, निकृष्ट दर्जाचे साहित्य, कामातील हलगर्जीपणा आणि प्रभावी देखरेखीचा अभाव यामुळे अनेक प्रकल्पांची अवस्था पहिल्याच पावसात दयनीय होते. विकासाच्या नावाखाली मोठे प्रकल्प उभे राहतात; परंतु त्यांची गुणवत्ता आणि टिकाऊपणा याकडे अपेक्षित लक्ष दिले जात नाही.

मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक आणि इतर अनेक शहरांमध्ये दरवर्षी पावसाळ्यात पाणी साचण्याची समस्या कायम आहे. यामागे केवळ अतिवृष्टी कारणीभूत नसून अपुरी जलनिस्सारण व्यवस्था, अतिक्रमणे, नाल्यांची वेळेवर साफसफाई न होणे आणि नियोजनाचा अभाव हीदेखील महत्त्वाची कारणे आहेत. स्मार्ट सिटी, अमृत योजना आणि विविध विकास योजनांवर मोठ्या प्रमाणावर निधी खर्च होत असतानाही नागरिकांना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत असेल, तर त्या विकासाची परिणामकारकता तपासणे आवश्यक ठरते. आज विकासाचा अर्थ केवळ मोठे पूल, रुंद रस्ते किंवा भव्य इमारती उभारणे एवढाच राहिलेला नाही. विकास म्हणजे सुरक्षित, टिकाऊ आणि जनतेला प्रत्यक्ष उपयोगी पडणाऱ्या सुविधा निर्माण करणे होय. एखादा प्रकल्प उद्घाटनाच्या दिवशी आकर्षक दिसणे महत्त्वाचे नाही; तर तो पुढील अनेक वर्षे सक्षमपणे सेवा देतो का, हे अधिक महत्त्वाचे आहे.

यासाठी पारदर्शक निविदा प्रक्रिया, दर्जेदार साहित्याचा वापर, स्वतंत्र गुणवत्ता तपासणी, काम पूर्ण झाल्यानंतर नियमित लेखापरीक्षण आणि दोषी कंत्राटदारांवर कठोर



कारवाई या उपाययोजना प्रभावीपणे राबविण्याची गरज आहे. केवळ चौकशी समित्या नेमून किंवा अहवाल मागवून प्रश्न सुटत नाहीत. जबाबदारी निश्चित होऊन दोषींवर प्रत्यक्ष कारवाई झाल्यासच परिस्थितीत बदल होईल.

पावसाने महाराष्ट्राला दिलासा दिला, परंतु त्याचबरोबर विकासकामांची वास्तविकता देखील उघड केली. नैसर्गिक आपत्ती रोखणे कोणाच्याही हातात नसते; पण त्यांचा सामना करण्यास सक्षम पायाभूत सुविधा उभारणे हे निश्चितच प्रशासनाच्या हातात असते. नागरिकांच्या करातून उभारल्या जाणाऱ्या प्रत्येक प्रकल्पाने गुणवत्ता, पारदर्शकता आणि टिकाऊपणाच्या कसोटीवर उतरले पाहिजे.

पहिल्या पावसाने पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे की, विकासाचे खरे मोजमाप उद्घाटनाच्या फितीने होत नाही; तर संकटाच्या काळात त्या विकासकामांनी जनतेला दिलेल्या आधाराने होते. महाराष्ट्राला आता केवळ कागदावरील विकास नको, तर दर्जेदार, जबाबदार आणि दीर्घकालीन विकासाची गरज आहे. अन्यथा प्रत्येक पावसाळा हा नव्या आश्वासनांचा नव्हे, तर जुन्याच अपयशांचा साक्षीदार ठरत राहील.

# साद घालतो निसर्ग...

महाराष्ट्रात जन्मल्याचा; महाराष्ट्रीय असल्याचा मला नेहमी अभिमान आहे आणि पुढेही राहील. अवघा महाराष्ट्र साऱ्या देशाची शान आहे जिथे मराठी भाषा आणि संस्कृती हातात हात घालून नांदतात.

या भूमीने शिवरायांची शौर्यगाथा घडताना पाहिली, थोर विचारवंत आणि संतांनी लोकसंस्कृती, लोकजागरातून सामाजिक परिवर्तनाचे धडे गिरविले. साहित्य, कला, संस्कृती आणि परंपरेचं माहेरघर म्हणून महाराष्ट्र ओळखला जाऊ लागला. महाराष्ट्राची दुसरी महत्त्वाची ओळख म्हणजे परशुरामाचा वरदहस्त लाभलेली नैसर्गिक साधनसंपत्ती. सह्याद्रीच्या रांगा, गड, किल्ले, नदी, नाले याची कृपादृष्टी महाराष्ट्रावर असल्याने सुजलाम सुफलाम, कणखर देश अर्थात महाराष्ट्र आज जगात भारी आहे. त्यामुळे वर्षभर वेगवेगळ्या ऋतूत बहरणाऱ्या वैभवसंपन्न निसर्गाची चेतनागुणोक्ती भाषा समजणं खूप आवश्यक आहे. निसर्गाचे देणे एकदाच मिळते त्याचे सार्थक करणे प्रयत्नावर अवलंबून असते. तेव्हा



भरभरून देणाऱ्या निसर्गावर आपलंही प्रेम असायलाचं हवं. कोकणातल्या सागरी किनारपट्टीवरच्या अद्वितीय रूपाची मोहिनी जगभरात सगळ्यांवर पडली आहे. कडेकपाऱ्यात वसलेला अखंड, बुलंद महाराष्ट्र निसर्ग भ्रमंती करणाऱ्यांना आनंद देतो हे अढळ सत्य आहे.

पावसाळ्यातल्या वातावरणात मुंबईसह अवघा महाराष्ट्र निसर्गाला कवेत घेण्यास आतूर असतो. इथली थंड हवेची ठिकाणं देशाची भूषण मानली जातात. डोळ्यांनी पाहायला अख्खा जन्म अपुरा पडेल एवढा भव्यदिव्य नैसर्गिक खजिना आपल्याकडे आहे. निसर्गाकडून पळीभर मिळताना जळी–स्थळी मिळणारा आनंद द्विगुणित व्हावा, यासाठी करा जिव्हाळा निसर्गाशी देईल तो सुखाच्या राशी याचा प्रत्यय येतो. मेघांनो, वृक्षांनो, वेलींनो, कळ्यांनो, फुलांनो तेरी भी चूप मेरी भी चूप कुणाला काही सांगू नका, कबूल? कबूल...! निसर्ग राजा ऐक सांगते गुपित जपलं रं, कुणी माझ्या मनात लपलयं रं... म्हणताना ती लाजते. ऋतू हिरवा... ऋतू बरवा म्हणत वारा गुणगुणतो, बेभान होतो. हुंकारातून ध्वनी प्रकटतो, असा बेफाम हा वारा, नदीला पूर आलेला... कशी येऊ... कशी येऊ... म्हणत सांगावा धाडतो प्रियकराला. मनात साठलेला आद्रतेचा पाऊस मिलनानंतर घन रूपात अवतरतो. रिमझिम पावसात कवी ना. धों. महानोर घन होऊन बरसतात. घन ओथंबून येती, बनांत राघू भिरती, पंखावरती सर ओघळती, झाडांतून झडझडती... घन ओथंबून झरती, नदीस सागर भरती... डोंगर लाटा वेढीत वाटा, वेढीत मजला नेती... घन ओथंबून आले, पिकांत केसर ओले... आडोशाला जरा बाजूला, साजन छैल छबिला घन होऊन बिलगला.

# मोक्षाची अनुभूती

एक असे गीत आहे की, ज्याचा अर्थ कुणालाही खऱ्या अर्थाने कळलाच नाही. त्याचे कारणही तसेच आहे. आज सारेचजण ऐहिक सुखाच्या उपभोगत अडकलेले आहेत. इथे मला एक जंगलच्या राजाची सिंहाची एक छोटीशी, साधीशी कथा आठवते आहे. तर कथा अशी आहे, जंगलातील एक सिंह अनेक दिवस उपाशी होता. एक दिवस त्याला एक छोटासा गोजिरवाणा ससा दिसला. पण त्याने विचार केला या छोट्याशा सशाने माझं पोट कसं भरणार? म्हणून त्याने त्याला सोडून दिलं.

पुढे त्याला एक धष्टपुष्ट काळवीट दिसलं. सिंहाने त्याच्यावर हल्ला केला, पण उपासमारीने थकलेल्या शरीरात ताकद उरली नव्हती आणि सिंहाला पाहून काळवीट जोराने पळून गेलं आणि सिंह काही त्याचा पाठलाग करू शकला नाही. शेवटी सिंहाने ठरवलं की, जाऊदे आता निदान छोटासा ससा तर ससा त्याला तरी खाऊन पोट भरावं. पण एव्हाना ससा सिंहाची चाहूल लागल्यामुळे पळून गेला होता. अशा रीतीने सिंह आपल्या



कर्मामुळे उपाशी राहिला. कथा तशी खूपच साधी आहे आणि त्याचा निष्कर्ष देखील. आपल्या एका निर्णयामुळे आपल्याला दूरगामी परिणाम हे भोगावे लागतात.

अगदी साध्या शब्दात सांगायचे झाले तर जसं एखाद्या स्वयंपाकघरात लहान वाटीतील थोडं अन्न नाकारलं जातं, तसा सिंहाने समोर आलेला तो गोजिरवाणा ससा नाकारला. त्याला वाटलं की, ही छोटी वाटी त्याच्या भुकेला पुरेशी नाही. पुढे त्याला मोठ्या परातीत भरलेलं जेवण म्हणजे धष्टपुष्ट काळवीट दिसलं. पण जेव्हा त्याने त्या परातीवर हात मारला, तेव्हा ती परात जोराने निसटून गेली. उपासमारीने थकलेल्या सिंहाकडे ती पकडण्याची ताकदच उरली नव्हती. शेवटी, सिंहाच्या ताटात काहीच उरलं नाही. वाटीही रिकामी, परातही रिकामी आणि सिंहाच्या पुढ्यात फक्त रिकामं ताट उरलं.

# शक्ती (Power) चा उपयोग

भौतिकशास्त्रात शक्ती (Power) म्हणजे एकक वेळेत केलेले कार्य (Work) किंवा वापरलेली ऊर्जा. एखादे काम किती वेगाने पूर्ण केले जाते हे शक्तीवरून समजते. शक्तीचे डख एकक वॅट (Watt) आहे. १ वॅट म्हणजे १ सेकंदात १ जूल कार्य करणे.

**✻ ज्ञानकोष**

शक्तीचा उपयोग आपल्या दैनंदिन जीवनात सर्वत्र आढळतो. घरातील पंखा, बल्ब, फ्रिज, वॉशिंग मशीन, मिक्सर, एअर कंडिशनर यांसारख्या विद्युत उपकरणांची क्षमता वीजशक्तीवर अवलंबून असते. उद्योगधंद्यांमध्ये मोठ्या यंत्रसामग्रीची कार्यक्षमता मोजण्यासाठी शक्तीचा वापर केला जातो. वाहनांमध्ये इंजिनाची शक्ती हॉर्सपॉवर (HP) किंवा किलोवॅट (kW) मध्ये दर्शविली जाते. जास्त शक्तीचे इंजिन अधिक वेगाने व जास्त भार वाहून नेऊ शकते.

शेतीमध्ये पाण्याचे पंप, ट्रॅक्टर, थ्रेशर आणि इतर कृषी यंत्रांची क्षमता देखील शक्तीवर ठरते. वैद्यकीय क्षेत्रात एक्स–रे, एमआरआय आणि विविध वैद्यकीय उपकरणांच्या कार्यासाठी योग्य शक्तीची आवश्यकता असते. तसेच जलविद्युत, औष्णिक आणि सौर ऊर्जा प्रकल्पांमध्ये निर्माण होणारी विद्युत शक्ती मेगावॅट (MW) किंवा गिगावॅट (GW) मध्ये मोजली जाते. अशा प्रकारे शक्ती ही विज्ञान, उद्योग, वाहतूक, शेती आणि घरगुती जीवनातील अत्यंत महत्त्वाची संकल्पना असून आधुनिक जीवन अधिक कार्यक्षम, जलद आणि सोयीस्कर बनविण्यात तिचा मोठा वाटा आहे.

# सुनील गावसकर – भारतीय क्रिकेटचा महान फलंदाज

**✻ विशेष व्यक्तीमत्व**

सुनील मनोहर गावसकर यांचा जन्म १० जुलै १९४९ रोजी मुंबई येथे झाला. ते भारतीय क्रिकेट इतिहासातील सर्वश्रेष्ठ सलामीवीर फलंदाजांपैकी एक मानले जातात. आपल्या उत्कृष्ट तंत्र, संयम आणि सातत्यपूर्ण फलंदाजीमुळे त्यांनी जागतिक क्रिकेटमध्ये भारताचे नाव उंचावले. त्यांनी १९७१ मध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध कसोटी पदार्पण केले आणि पहिल्याच मालिकेत ७७४ धावा करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.



सुनील गावसकर हे कसोटी क्रिकेटमध्ये १०,००० धावांचा टप्पा गाठणारे जगातील पहिले फलंदाज ठरले. त्यांनी १२५ कसोटी सामन्यांत १०,१२२ धावा आणि ३४ शतके झळकावली. त्यांच्या काळात वेगवान गोलंदाजांचा सामना करत त्यांनी अनेक ऐतिहासिक खेळी केल्या.

क्रिकेटमधील उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना पद्मभूषण आणि पद्मश्री या भारत सरकारच्या सन्मानांनी गौरविण्यात आले आहे. निवृत्तीनंतर त्यांनी समालोचक, लेखक आणि क्रिकेट विश्लेषक म्हणूनही मोठे योगदान दिले. सुनील गावसकर हे मेहनत, शिस्त, चिकाटी आणि देशप्रेम यांचे प्रेरणादायी उदाहरण असून भारतीय क्रिकेटमधील त्यांचे स्थान आजही अढळ आहे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक – चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२